# संपादकीय

गेल्या काही वर्षांप्रमाणे या वर्षीचा 'आठ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिनही' अनेक ठिकाणी मोठ्या उत्साहाने साजरा झाला. पाणी, पाळणा-घर आणि जागतिक शांतता या तीन प्रश्नांवर या आठ मार्चला आवाज उठवायचा असे जानेवारीत झालेल्या एका बैठकीत महाराष्ट्रातील बहुसंख्य संघर्षवादी महिला-संघटनांनी, व्यक्तींनी ठरविले होते, आणि त्याप्रमाणे आठ मार्च साजरा झाला. निदर्शने, मोर्चे, मिरवणुका, सभा, नाटके, परिसंवाद इ. माध्यमांतून. (आमच्याकडे आलेले काही रिपोर्ट अंकात छापले आहेतच.)

आठ मार्च झाला पण पुढे काय ? एक दिवस दणदणीत कार्यक्रम केला म्हणजे आपले प्रश्न सुटतात असे नाही. आज अनेक प्रश्नांची मोहोळे उठत आहेत. महागाई, बेकारी (जी अनेक स्त्रियांना वेश्या व्यवसायात ढकलते) भाववाढ, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई, मुलांच्या शिक्षणासंबंधी येणाऱ्या अडचणी, घरांचा प्रश्न इ. प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहेत. या सर्व प्रश्नामध्ये पाण्याचा प्रश्न अधिकाधिक गंभीर बनत आहे. शहरी असो किंवा ग्रामीण, गरीब असो किंवा मध्यमवर्गीय आज सर्वांनाच पाण्याच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागत आहे. पाण्याच्या प्रश्नासाठी ग्रामीण भागामध्ये सहकारी कारखाने आले, कालवे आले, पण पाण्याच्या प्रश्नाची समाधानकारक सोडवणूक होऊ शकलेली नाही. ज्याला बागाईती पट्टा म्हणायचा तेथे ही स्थिती तर ज्या भागामध्ये पाटबंधारे, कालवे जाऊ शकले नाहीत जो भाग दुष्काळी आहे तेथील पाण्याच्या प्रश्नाची कल्पनाच करवत नाही आज ग्रामीण भागासाठी, आदिवासी विभागासाठी विकासाच्या अनेक योजना असतात पण या योजना आखल्या जाऊनही पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही. स्वातंत्र्य मिळून ३४ वर्षे झाली, ५ पंचवार्षिक योजना झाल्या. जिल्हा, तालुका, ग्राम पातळीवरील नियोजनाचे हजारो आराखडे झाले. विविध प्रयोग झाले. पण पिण्याच्या पाण्यासारखा, अतिशय जीवनावश्यक प्रश्न सुटू शकला नाही.

या संपादकीयात या पाण्याच्या प्रश्नाबद्दल सविस्तर लिहावं लागत आहे. कारण पाण्याचा प्रश्न सर्व समाजाचा असला तरी त्या प्रश्नाची अधिक झळ स्त्रियांना बसते. पाण्याच्या प्रश्नामुळे घरकाम आणि बाहेरचे काम अशा नेहमीच्याच कसरतीत दररोजचं तारेवरचं चालणं किती अवघड होत आहे ! पाण्याचा प्रश्न स्त्रीच्या घरकामाचं ओझं अधिक वाढवतो. पाण्याचा प्रश्न बायका बायकांमध्ये भांडणं निर्माण करतो. मुलाबाळांवर राग काढायला लावतो. पाणी न मिळाल्यामुळे, पाण्याचा रोजचा प्रश्न असल्यामुळे २१३ स्त्रियांना वेड लागल्याची उदाहरणे नुकतीच एका जबाबदार समाज कार्यकर्त्याने सांगितली. १९८१ च्या दसऱ्यानंतर मुंबईला २ दिवस पाणी न मिळाल्याने नागरिकांनी 'रस्ता रोको' चालू केले व त्यावर गोळीबार होऊन एक तरूण मृत्यूमुखी पडला, पाण्यासाठी जनतेला गोळयाही खाव्या लागत आहेत.

दलित किंवा आदिवासींना तर जातिव्यवस्थेतील त्यांच्या स्थानामुळे सवर्ण,-मालदार लोकांकडून पाणी नाकारले जाते, पाण्याला हात लावला तर बहिष्कार पडतो. शहरामध्ये एक एक खोली घेऊन रहाणाऱ्या कामगार कष्टकऱ्यांना घरमालक पाण्यावरून त्रास देतात. मालकाच्या नावे नळ असतो आणि ह्या नळाला कुलूप असते. आणि मालक कुलूप काढेल तेवढ्या वेळातच सगळ्या भाडेकरूंनी पाणी भरायचे. मग पाण्याचा काळाबाजार चालू होतो. ५ पैसे बादली, १०

पैसे बादली, २५ पैसे बादली अशी पाण्याची विक्री चालू होते.

भारताची आर्यभट्ट, रोहिणी अंतराळयाने अवकाशात झेपावली तेव्हा भारताने वैज्ञानिक प्रगती केल्याबद्दल आज शासन स्वतःची पाठ थोपटून घेत आहे. एवढे वैज्ञानिक संशोधन प्रगति झालेल्या भारतात सर्वसामान्य जनतेचा पाण्याचा प्रश्न सुटू शकत नाही ही गोष्ट खेदाची आहे. शस्त्रास्त्रांवर वारेमाप खर्च होत आहे, इतर अनुत्पादक बाबींवर पैसा ओतला जात आहे. पण पाण्याच्या प्रश्नावर योजना आखल्या तरी पैसे नसतात आणि ज्या योजना चालू आहेत त्यांची योग्य ती काळजी घेऊन देखभाल केली जात नाही.

पुरामुळे अनेक ठिकाणी अतिशय मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जाते. पण एवढ्या मोठ्या प्रमाणावर गोडे पाणी मिळूनही। या पुरावर नियंत्रण करून त्याचा पाण्यांचा प्रश्न सोडविण्याची कसलीही कायमस्वरुपी योजना अंमलात येत नाही. आज देशातील लाखो स्त्री-पुरुषांना काम, नोकरी हवी आहे. पोटासाठी वणवण फिरणाऱ्या जनतेची कुठेही जायची तयारी असते. सर्व-सामान्य जनतेसाठी आखल्या जाणाऱ्या योजनांचा अभाव, जनतेच्या हिताकडे झालेले दुर्लक्ष यामुळे भारतात पाण्यासारखी विपुल नैसर्गिक संपत्ती असूनही पाण्याचा मानवनिर्मित दुष्काळ झाला आहे.

गरीब जनतेच्या लेखी हे युग हे संघर्षाचे युग आहे. पाण्यासाठीही संघर्ष करावा लागणार असे दिसतेय. स्त्रीमुक्ती आंदोलन संपर्क समितीने (महाराष्ट्र) आगामी काळात पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरविले आहे. सध्या देशात 'जातीयवादी, जमातवादी शक्तींचे थैमान चालू झाले आहे. अशा दंगली चालू झाल्या की रोजच्या प्रश्नावरील लढ्यातही फूट पडण्याची शक्यता असते. जात, धर्म, पंथाच्या भिंती पार करून सर्व स्त्रिया पाण्याच्या प्रश्नाची तड लावण्यासाठी एकत्र येतील, त्यांनी एकत्र आले पाहिजे.

***

# पुण्यातील आंतरराष्ट्रीय महिला दिन

९ व १० जानेवारी १९८२ रोजी पुण्यात झालेल्या स्त्री-मुक्ती आंदोलन संपर्क समितीच्या चर्चा-सत्रात ठरल्याप्रमाणे यंदाचा ८ मार्च पुण्यामध्ये खालील मागण्यांवर भर देऊन पाळण्यात आला:

(१) खेड्यापाड्यातून व शहरात झोपडपट्ट्यातून पिण्याच्या पाण्याची सोय व संडासांची सोय शासनाने अग्रक्रमाने करावी.

(२) कामाच्या ठिकाणी आणि वस्त्यांमधून शासनाने पाळणाघरे सुरू करावीत. त्यांच्या व्यवस्थापनात स्थानिक स्त्रियांचा व स्त्रीसंघटनांचा सहभाग असावा.

(३) शस्त्रास्त्रस्पर्धा व युद्धे थांबवून जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न व्हावेत.

पुण्यामध्ये २ मार्च ते ७ मार्च हे दिवस वरील मागण्यांच्या प्रचारासाठी उपयोगात आणले. या मागण्यांच्या चित्रयुक्त फलकांचे ठिकठिकाणी प्रदर्शन मोक्याच्या ठिकाणी छोट्या सभा वगैरे कार्यक्रम त्यासाठी योजले होते. ८ मार्चचे महत्व व मागण्यांचे स्पष्टीकरण देणारी हजारो पत्रके या सभातून वाटण्यात आली. लोकांचा प्रतिसाद खूपच उत्साहजनक होता.

८ मार्चला फुले मंडईतील टिळक पुतळ्याजवळ २॥–३ वाजल्यापासूनच स्त्रिया जमू लागल्या. स्त्री-मुक्तीची गाणी आणि घोषणा लोकांचे लक्ष वेधून घेत होत्या. ३॥ वाजता हातात मागण्यांचे फलक घेऊन सात-आठशे स्त्रिया मोर्चाने म्युनिसिपल कमिशनरच्या ऑफिसकडे निवेदन देण्यासाठी निघाल्या. 'आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा विजय असो' 'स्त्रियांच्या एकजुटीचा विजय असो' 'पाण्यासाठी संघटना हवी,' 'पाळणाघरा-साठी संघटना हवी,' 'पाणी द्या, संडास द्या, माणसा-सारखे जगू द्या' वगैरे शेकडो मुखांतून बाहेर पडणाऱ्या घोषणा वातावरण निनादून टाकत होत्या. महानगर-

(पान ४१ वर पहा)